महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई. मेल :- directoropmsedcl@gmail.com.

क्र.संचालक(संचलन)/३००१६
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
प्रकाशगड, ६ वा मजला,
स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : ३०/१०/२०१३

---

# परिपत्रक

**विषय :-** अभ्यागतांना कार्यालयात देण्यात येणाऱ्या प्रवेशाबाबत व मध्यस्थामार्फत काम न करण्या बाबत.

---

नवीन जोडणी, देयकाबाबत वाद किंवा आपल्याशी संबंधीत तत्सम कामासाठी अनेक जण आपल्या विविध कार्यालयात येत असतात. ग्राहकांना सौजन्यपूर्ण वागणूक देणे आणि त्यांच्या तक्रारी किमान वेळेत सोडविण्यासाठी सर्वांनी विशेष प्रयत्न करायचे आहेत.

अर्थात हे करीत असतांना एकतर ग्राहक स्वत: किंवा संबंधीत कंपनीचे ओळखपत्र असलेला कर्मचारी यांनाच प्रवेश देण्यांत यावा. या शिवाय कुठल्याही मध्यस्थाला कार्यालयात प्रवेश देण्यात येऊ नये. त्यांनी आणलेल्या कामाची/तक्रारीची दखल घेऊ नये, अशा स्पष्ट सुचना देण्यात येत आहेत. नवीन जोडणीसंबंधीच्या पाठपुराव्यासाठी संबंधिताने ऑन लाईन अर्ज केलेला असणे आवश्यक आहे.

या सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. या स्पष्ट निर्देशानंतरही जर कुणी अधिकारी/ कर्मचारी या सुचनांचे उल्लंघन करतांना आढळल्यास कंपनीच्या नियमांनुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

हे परिपत्रक कंपनीच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून, कुठल्याही कार्यालयास याची स्वतंत्र प्रत पाठविली जाणार नाही.

**संचालक (संचलन)**